27

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित
दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पुर्व), मुंबई ४०० ०६५

क्र. प्रशा-२०११/केमाअ/ ९६

जानेवारी ५, २०११.

## कार्यालयीन आदेश

"माहितीचा अधिकार अधिनियम २००५" अंतर्गत कलम ५ मधील तरतुदीनुसार या महामंडळासाठी सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी, शासकीय माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मधील विवरणपत्रानुसार निश्चित करण्यात येत आहेत.

व्यवस्थापकीय संचालक
५.१.११

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित
दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पुर्व), मुंबई ४०० ०६५

## परिशिष्ट "अ"

### केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५ (१),(२) व १९ नुसार "सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी", "शासकीय माहिती अधिकारी" व "अपिलीय अधिकारी"

| अ. क्र. | विषय | सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी | शासकीय माहिती अधिकारी | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | औद्योगिक व कामगार न्यायालयातील न्यायालयीन प्रकरणे, विभागीय चौकशी प्रकरणे, नविन चित्रपटगृह बांधणीसाठी बिनव्याजी कर्जाऊ योजनेबाबत, दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस अर्थसहाय्य योजनेबाबत, कामगार संघटनांच्या मागण्यांविषयी, रजा प्रकरणे, निलंबन प्रकरणे, वाहन विषयक बाबी, दुरध्वनी सेवाविषयक, अनुकंपा प्रकरणे | सहाय्यक प्रशासकीय अधिकारी | मुख्य प्रशासकीय अधिकारी | सह. व्यवस्थापकीय संचालिका |
| २ | सर्व प्रकारचे लेखा परिक्षण विषयक बाबी, विविध अग्रिम विषयक बाबी, भत्ते, वैद्यकिय परिपूर्तीबाबत आयकर विषयक बाबी, चित्रीकरणास्तव देण्यात येणा-या साहित्यविषयक, संचालक मंडळाबाबत सर्व बाबी. | उपमुख्यलेखाधिकारी | वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी | सह. व्यवस्थापकीय संचालिका |
| ३ | चित्रनगरी परिसरातील सुरक्षे संबंधी, चित्रनगरीत प्रवेश करणा-या अधिकृत व अनधिकृत व्यक्ती व वाहनांबाबत, चित्रनगरीत घडणा-या अपघाती दुर्घटनाबाबत, चोरीची प्रकरणे, अनधिकृत बांधकाम प्रकरणे तसेच सर्व सुरक्षा विषयक बाबी | शिफ्ट इंचार्ज | सुरक्षा अधिकारी | सह. व्यवस्थापकीय संचालिका |
| ४ | जमीनविषयक बाबी, बांधकाम विषयी, जल पुरवठ्याबाबत, गृहनिर्माण सोसायटी विषयक, नविन स्थळ निर्माण करण्याविषयी, बागबगीचे सुशोभिकरण तसेच देखभाल प्रकरण, प्रसाधनगृहांबाबत तसेच सर्वप्रकारच्या मुलभूत सोयी सुविधांबाबत, कंत्राट प्रकरणे, निविदा प्रकरण, चित्रनगरीतील सर्व इमारत विषयक बाबी. | सहाय्यक अभियंता | उप अभियंता (स्थापत्य) | सह. व्यवस्थापकीय संचालिका |
| ५ | चित्रनगरी परिसरातील विद्युत पुरवठ्याबाबत तसेच चित्रीकरणास्तव किंवा देखावे उभारण्यास्तव देण्यात आलेल्या विद्युत पुरवठ्याबाबत, वातानुकूलीन यंत्राच्या पुरवठ्याबाबत, विद्युत विषयक सर्व बाबी. | पर्यवेक्षक (विद्युत) | सहाय्यक अभियंता (विद्युत) | सह. व्यवस्थापकीय संचालिका |
| ६ | बाह्य चित्रीकरण स्थळांच्या व कलागारेंच्या आरक्षणाबाबत, चित्रीकरणाविषयी, मेकअपरूम रूम्स आरक्षणाविषयी, चित्रीकरणास्तव किंवा देखावे उभारण्यास्तव देण्यात आलेल्या सुविधांविषयक बाबी, थकबाकी प्रकरणे, निर्मिती संस्थांना भाड्याने देण्यात येत असलेले कलागारे व बाह्य चित्रीकरण स्थळांबाबत | सहाय्यक व्यवस्थापक (कलागारे) | व्यवस्थापक (कलागारे) | सह. व्यवस्थापकीय संचालिका |

शासकीय माहिती अधिकारी व सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी म्हणून निर्देशित केलेल्या पदांचा कार्यभार भविष्यात ज्या अधिका-याकडे सोपविला जाईल तो अधिकारी शासकीय माहिती अधिकारी/सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी म्हणून गृहित धरण्यात येईल.

(स्वाक्षरी)
व्यवस्थापकीय संचालक ५.१.२०११